(३१)

मा. महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका.
ठराव क्र. मआ/सुपूर्ती/डि.ई.एल/१५०२
दि. 19 JUL 2017

उपआयुक्त झोपडपट्टी निर्मुलन व
पुर्नवसन विभाग, पुणे महानगरपालिका.
जा.क्र. मआ/झोनिपु/३/४५१
दि. १९/०७/२०१७

विषय – नव्याने स्थापन केलेल्या उपआयुक्त परिमंडळ विभाग क्र. ५ यांना सक्षम प्राधिकारी (झोनिपु) म्हणून अधिकार प्रदान करणेबाबत.

संदर्भ – १. मा महापालिका आयुक्त ठराव क्र. १/४१३ दि.११/०७/२००८.
२. मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. १/४५५ दि.२९/७/२००८.
३. महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक– पुणे विभागीय पुरवणी, गुरूवार ते बुधवार, मे १६–२२, २०१२ वैशाख २६ ते जेष्ठ १, शके १९३५.
४.मा. महापालिका आयुक्त ठराव क्र.१/५६ दि.२८/४/२०१७.
५. मा. महापालिका आयुक्त कार्यालय जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/११३२ दि.२६/५/२०१७.

## अधिकार सुपूर्ती आदेश आज्ञापत्र

पुणे महापालिकेतील झोपडपट्टी निर्मुलन व पुर्नवसन विभागाचे विकेंद्रीकरण झाले असल्याने व कामाची व्याप्ती लक्षात घेता सदरचे काम जलद गतीने पुर्ण करण्याचे दृष्टिने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ (एस) अन्वये ''सक्षम प्राधिकारी (झोनिपु)'' म्हणून महापालिका आयुक्त यांना प्राप्त असलेले अधिकार संदर्भ क्र. १ व २ अन्वये परिमंडळ विभाग क्र. १ ते ४ यांना यापूर्वीच प्रदान करण्यात आलेले आहेत. तसेच संदर्भ क्र.३ अन्वये अधिसूचना महाराष्ट्र शासनं राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र. ४ अन्वये पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ च्या प्रभाग रचनेनुसार नव्याने निर्माण केलेल्या परिमंडळ विभाग क्र. ५ यांना संदर्भ क्र. ५ अन्वयेच्या कार्यालयीन आदेशानुसार कार्यभार देण्यात आलेला आहे. उपआयुक्त परिमंडळ विभाग क्र. ५ यांना त्यांचे अधिपत्याखालील कार्यक्षेत्राचे ''सक्षम प्राधिकारी (झोनिपु)'' या पदाचे अधिकार या अधिकार सुपूर्ती आदेशान्वये प्रदान करण्यात येते आहेत.

| अ.क्र | पद | देण्यात आलेले अधिकार | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | उपआयुक्त परिमंडळ विभाग क्रमांक ५, पुणे महानगरपालिका. | सक्षम प्राधिकारी (झोनिपु) म्हणुन महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ४ अन्वये झोपडपट्ट्या घोषित करणे, रेकॉर्ड जतन करणे कलम ५ अन्वये झोपडपट्टी वस्त्यामध्ये सुधारणा कामे करणे. तसेच कलम २२ अन्वये दाखल अर्जावर सुनावणी घेणे व निर्णय देणे तसेच या कायद्यातील सक्षम प्राधिकाऱ्यास लागु | त्यांचे अधिपत्याखालील कार्यक्षेत्रासाठी |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | असलेले सर्व अधिकार व तद्नुषंगिक सर्व कृती. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१ मध्ये महानगरपालिकेच्या जागेतुन व्यक्तिला काढून टाकणेबाबत कलम ८१ (अ) ते ८१ (ई) अन्वये तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. कलम ८१-अ,८१-ब,८१-क,८१-ई व कलम ६९ अन्वये पुणे महापालिका आयुक्त यांना असलेले अधिकार सक्षम प्राधिकारी (झोनिपु) तथा परिमंडळ विभाग क्र. १ ते ५ यांना प्रदान करण्यात येत आहेत. | |
| २ | महापालिका सहाय्यक आयुक्त, पुणे महानगरपालिका | न्यायालयीन कामे, जागा पहाणी, पंचनामे, प्राथमिक सर्व्हेक्षण अहवाल, रहिवाश्यांची यादी तयार करणे, लाभार्थी निश्चिती करण्यासाठी शिफारशी व अभिप्राय सक्षम प्राधिकारी (झोनिपु) तथा सह महापालिका आयुक्त/उपआयुक्त परिमंडळे विभाग क्र. ५ पुणे महागनरपालिका यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणे व तद्नुषंगिक सर्व कामे पाहणे. | त्यांचे अधिपत्याखालील कार्यक्षेत्रासाठी |

वरीलप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ अन्वये शासनाने वेळोवेळी पारित केलेले आदेश सूचना याप्रमाणे विहित निकषानुसार कामकाज करावे.

(कुणाल कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत-

१. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका.
२. अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष), पुणे महानगरपालिका.
३. अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)/(इस्टेट), पुणे महानगरपालिका.
४. शहर अभियंता, पुणे महानगरपालिका.
५. सह महापालिका आयुक्त/उपआयुक्त, परिमंडळ १,२,३,४ आणि ५.
६. सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त, पुणे महानगरपालिका.
७. मुख्य विधी अधिकारी, पुणे महानगरपालिका.
८. उपआयुक्त (सामान्य प्रशासन), पुणे महानगरपालिका.
९. आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका.

Scanned with OKEN Scanner